MHWS11000042-2026

# सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कारंजा (लाड) यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी पी. डी. देवरे)

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २१/२०२६

१. **अलताब उस्मान गारवे**
वय अ. ३२ वर्ष, व्यवसाय – मजुरी
रा. अबुझर डेरी, इदगाह जवळ, मुस्लीम कॉलनी
खडके, जळगाव, ता. जि. जळगाव

२. **धन्नो उसमान गारवे**
वय अ. ५० वर्ष, व्यवसाय – गृहिणी
रा. गवळीपुरा, उमर मस्जीद जवळ, कारंजा
ता. कारंजा लाड, जि. वाशिम

३. **एसार उसमान गारवे**
वय अ. २८ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
रा. नवी इदगाह जवळ, मुस्लीम कॉलनी,
भुसावळ, जि. जळगाव

**....अर्जदार**

**– विरूध्द –**

**निरंक** **.... गैरअर्जदार**

दावा– बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज.

..........................................................................................................

अर्जदारांतर्फे वकील **श्री. आवेश इसा शेख**

सामनेवालातर्फे वकील – **कोणी नाही**

..........................................................................................................

दि.कि.अर्ज.क्र. २१/२०२६

**निशाणी क्र.०१ वरील आदेश**

प्रस्तुत अर्ज मयत उस्मान हसन गारवे यांचा वारस दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. **अर्जदार यांचे कथन खालीलप्रमाणे –**

मयत उस्मान हसन गारवे हे अर्जदार क्र. २ चे पती व अर्जदार क्र. ०१ व ३ चे वडील आहे. मयत उस्मान हसन गारवे यांचा मृत्यु दिनांक ३०/०५/१९९७ रोजी मौजे गवळीपुरा, कारंजा लाड, ता. कारंजा जि. वाशिम येथे झाला. करिता अर्जदारांव्यतिरिक्त उस्मान हसन गारवे अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारांना ते उस्मान हसन गारवे यांचे वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारस दाखला आवश्यक आहे. सबब, अर्जदारांनी ते उस्मान हसन गारवे यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

४. निशाणी क्रमांक ०१ वर आदेश पारीत करुन दिनांक ०६/०२/२०२६ रोजीच्या 'दैनिक पुण्यनगरी' निशाणी क्र. १४ या वर्तमानपत्रातुन जाहीर प्रगटन देवून तसेच जाहीरनाम्याद्वारे हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु अद्यापपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

५. अर्जदारांच्या कथनांवरून माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत काय? | **होय** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ बाबत –**

६. सदर अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदार क्र.०१ अलताब उस्मान गारवे यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक ०९ वर दाखल केले आहे. मयत उस्मान हसन गारवे यांचे मृत्यु दाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र. १० वर, अर्जदारांच्या मुळ आधारकार्डवरुन पडताळणी केलेल्या आधारकार्डच्या प्रती अनुक्रमे निशाणी क्र. ११ ते १३ वर व 'दैनिक पुण्यनगरी' या वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र. १४ वर असे दस्तऐवज दाखल केलेले आहेत.

७. जाहीर नोटीस दिल्यानंतरही प्रस्तुत अर्जामध्ये कोणीही हजर झाले नाही, अगर आपली हरकत नोंदविलेली नाही. अर्जदार यांच्या वतीने त्यांच्या मा. विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत उस्मान हसन गारवे इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

८. अभिलेखावर दाखल कागदपत्रे व पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार हे मयत उस्मान हसन गारवे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांनी दिलेला पुरावा हा विनाआव्हानीत राहीला व सदर पुराव्यावर अविश्वास दर्शवावा असे कोणतेही कारण दिसून येत नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत उस्मान हसन गारवे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला देण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.07.13 17:42:35 +0530

दिनांकः १३/०७/२०२६

**(पी. डी. देवरे)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
कारंजा (लाड)

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | ---------- |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 13/07/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 13/07/2026 |
| Order uploaded on | :- | 13/07/2026 |